संस्थापक-नाट्याचार्य कृष्णाजी प्रभाकर खाडिलकर

संपादकीय

नवा काळ

।। न मे भक्त प्रणश्यति ।।

# साधनशुचिता पाळणारा नेता हरपला

**मृत्यू** कोणाला चुकला नाही. परंतु एखाद्याला चकवून जेव्हा तो येतो त्यावेळी त्याचे दुःख अधिक असते. मनोहर पर्रिकरांबाबत असेच घडले. आपल्या संपूर्ण आयुष्यात ज्या व्यक्तीने सभ्यता कधी सोडली नाही. साधेपणाने राहून आपली मूल्यांवरची निष्ठा कधी ढळू दिली नाही. समाजात काहीतरी चांगलं घडावं सामान्य माणसाला अधिक सुखकर जीवन जगता यावं आणि देशाच्या विकासामध्ये आपलेही छोटेसे योगदान असावे. अशाच मर्यादित उद्दिष्टांनी कार्यरत राहाणाऱ्या पर्रिकरांना काळाने इतक्या लवकर बोलवून घ्यावे याचे शल्य निश्चितच अनेकांना जाणवत राहील. आयआयटीसारख्या संस्थेतून घेतलेले उच्च शिक्षण नोकरी करण्यासाठी न वापरता त्या कौशल्याचा उपयोग अधिक चांगले काही घडवण्यासाठी करावा, या विचाराने त्यांनी राजकारणात प्रवेश केला. रा.स्व.संघाच्या मुशीत तयार झालेले हे बावनकशी सोने राजकारणाच्या भट्टीतही तावुन सुलाखून टिकून होते. त्याचे एकमेव कारण म्हणजे आपल्या जीवननिष्ठा त्यांनी ढळू दिल्या नाहीत. स्वाभिमान कधी सोडला नाही. राजकारणातल्या गुलामगिरीला किंबहुना हुजरेगिरीला त्यांनी कधी थारा दिला नाही. राजकीय नेता म्हणजे काही वेगळे रसायन नसते. ते तुमच्या आमच्यासारखेच सामान्य माणसाप्रमाणे जीवन जगणारे व्यक्तिमत्व असते. पण सत्ता आणि अधिकाराची झुल पांघरायला मिळाल्यानंतर सहजपणाने प्रवृत्तींमध्ये बदल होतो आणि त्यातले माणूसपण हरवून पांघरलेली झुल हीच आपली ओळख आहे अशा कुठल्यातरी भ्रमामध्ये ती व्यक्ती वावरू लागते. आजच्या राजकारणामध्ये अशी झुल पांघरून वावरणाऱ्यांची ९९ टक्के संख्या आहे. पर्रिकरांनी ती झुल नेहमीच बाजूला ठेवली आणि माणुसकीचा गहिवर कधीही ढळू दिला नाही. आज राष्ट्रीय स्वयंसेवक संघापासून ते भारतीय जनता पार्टीपर्यंत अनेक नेत्यांनी त्यांना ज्या शब्दामध्ये श्रध्दांजली वाहिली आहे त्या शब्दांची जरी उजळणी केली तरी त्या शब्दांना पर्रिकर जसे पात्र ठरले तसे आपण पात्र आहोत का याचा त्यांनी आत्मपरीक्षण करून विचार केला पाहिजे. श्रध्दांजलीचा औपचारिकपणा बाजूला ठेवून विशुध्द राजकारणाचा हा मनोहर संस्कार आपल्यालाही स्वीकारता येईल का याचा त्यांनी विचार केला पाहिजे.

## पर्रिकरांच्या अनुकरणाचे काय?

गोव्यासारख्या जेमतेम चाळीस आमदार असलेल्या राज्यात राजकारण असणार तरी काय परंतु सत्तेचा सारीपाट हा अधिकारांशी जोडला गेलेला असतो आणि सतत पैशाचे खेळ तिथे चालत असल्याने राजकारणापेक्षाही सत्ताकारणाचा प्रभाव गोव्यामध्ये दिसून आला. समाजकारणासाठी राजकारण हा विषय कधीच बाजूला पडल्यामुळे सत्ताकारणासाठी राजकारण अशीच त्याची सध्याची ओळख आहे. पर्रिकरांनाही नाईलाजाने तेच करावे लागत होते. म्हणूनच त्यांची सर्वाधिक कसोटी लागत होती. तरीही त्यांनी आपली प्रतिमा आणि प्रतिष्ठा कधीही ढळू दिली नाही. त्याची चौकट मोडू दिली नाही. गोवा राज्य झाल्यापासून भाऊसाहेब बांदोडकर, शशिकला काकोडकर अशा सगळ्या महाराष्ट्र गोमंतकवादी पक्षाचा प्रभाव तिथे होता. या सत्ताकारणाला शह देण्याचा प्रयत्न पर्रिकरांना करायचा होता. काही प्रमाणात ते त्यात यशस्वी झाले आणि त्या छोट्याशा राज्याचा कारभार पाहाणारे सरकार हे अधिकाधिक जनताभिमुख राहील. गैरकारभार आणि भ्रष्टाचाराला तिथे थारा नसेल असे एक अभिवचन घेऊन पर्रिकरांनी आपला राजकीय प्रवास कायम ठेवला होता. इतका उच्चविद्याविभूषित राजकारणी असूनही त्याने सामान्य कार्यकर्त्यांना किंवा स्वयंसेवकांनासुध्दा बडेजावपणाचा अनुभव येऊ दिला नाही. त्यांच्या साधेपणाची अनेक वैशिष्ट्ये सांगितली जातात. ऑफिसच्या कामाव्यतिरिक्त स्वतःचे वाहन वापरणारा खाजगी समारंभांमध्ये सरकारी सुरक्षा कवच न घेणारा, लग्नसमारंभांमध्ये अन्य वऱ्हाडींबरोबरच जेवणाच्याही लाईनीत उभा राहाणारा, हा सर्वसामान्यांचा नेता होता. त्यामध्ये कोणतीही अतिशयाक्ती नाही म्हणूनच त्यांना बावनकशी सोने म्हणता येते. प्रश्न हाच येतो की आजच्या बडेजाव मिरवणाऱ्या राजकारणामध्ये पर्रिकरांच्या या साधेपणाचे अनुकरण होणार आहे का दुर्दैवाने अनेक अशा नेत्यांविषयी श्रध्दांजली वाहताना प्रचंड गुणगान केले जाते पण त्यांचे अनुकरण करण्याचे धैर्य कोणीही दाखवत नाही. ते केवळ दहा वर्षाच्या बोलीने राजकारणात आले होते. परंतु त्यांच्यावर जबाबदाऱ्या टाकत गेल्यामुळे आणि ते भिडस्त स्वभावाचे असल्याने त्यांना या जबाबदाऱ्या स्वीकाराव्या लागल्या.

## प्रतिभासंपन्न नेता

दोन वर्षांपूर्वी देशाच्या संरक्षण मंत्रीपदाचा मोठा भार तितक्याच मोठ्या आत्मविश्वासाने त्यांच्याकडे सोपवला गेला होता त्यावेळीसुध्दा हा मृत्यू अशाच छुप्या पध्दतीने त्यांच्या शरीरात ठाण मांडेल अशी शंकादेखील आली नव्हती. या नेत्याची समाजाला किंवा देशाला खऱ्या अर्थाने गरज होती. याच्या अनुकरणातून काही प्रमाणात का होईना राजकारणाचे शुध्दीकरण होऊ पाहात होते. एक गोष्ट मात्र खरी की राजकारणाचा हा सगळा पसारा आणि व्याप साधेपणाने वावरणाऱ्यांना पेलवला जात नाही. किंबहुना सोसवत नाही. अन्यथा पर्रिकरांनी पत्नीला दिलेल्या आश्वासनाप्रमाणे दहा वर्षेच राजकारण केले असते तर कदाचित चित्र वेगळे असते. दुर्दैवाने त्यांच्या पत्नीचेही असेच अकाली निधन झाले असल्याने आधीच खचलेले पर्रिकर राजकारणात व्यस्त राहाण्याचा प्रयत्न करीत होते. अलीकडच्याच एका लेखामध्ये त्यांनी हे स्वतः मान्य केले होते की राजकारणात यशाची एकेक पायरी चढत असताना माझी म्हणून जी माणसे होती ती सोडून गेली होती. त्यांच्या या विधानातून पर्रिकर हे किती भावनाशील होते किंवा राजकारणात वावरताना त्यांना या भावनाही किती कठोरपणे बाजूला ठेवाव्या लागत असतील याची कल्पना येते. खरे सांगायचे तर पर्रिकरांनी संघाचे संस्कार राजकारणात कायम ठेवलेच परंतु नानाजी देशमुखांसारखी साधनशुचिता पाळणारा हा अलीकडच्या पिढीतला प्रतिभासंपन्न नेता होता. हे मात्र विसरता येणार नाही.